# अर्थपूर्ण

एप्रिल २०१३ | ₹ ४०
पुणे, वर्ष ३, अंक ०४

**आर्थिक साक्षरता + पारदर्शकता = स्वाभिमानी भारत**

## गुंतवणुकीचा सुखकर प्रवास
## आरोग्य, शिक्षण, कुटुंब, मित्र आणि...



संपादक
**यमाजी मालकर**
**संपादन साहाय्य : सम्राट शिरवळकर**
editor.arthapurna@gmail.com

**'अर्थपूर्ण' पब्लिकेशन्स प्रा. लि.**
१०४ निलगिरी अपार्टमेंट्स, दुसरा मजला,
कर्वे रस्ता, कोथरूड, पुणे - ४११०३८
**फोन : ०२०- ३२६००९९६**
www.arthapurna.org

# अर्थपूर्ण

एप्रिल २०१३

वर्ष तिसरे
अंक चौथा

**डिझाईन**
ऑफबीट कॉन्सेप्टस्,
पुणे ९८८१०९८०१०

**मुद्रितशोधन :** विजय जोशी
**मुखपृष्ठ :** प्रविण शिंदे

**जाहिरात संपर्क**
राजन मिडिया स्टेशन,
बी १, यशोराम अपार्टमेंट,
४३६-ए, नारायण पेठ,
पत्र्यामारुती गल्ली,
पुणे-४११०३०
फोन ०२०-३०२९२४४४,
३०२९२४४५
rajanmediasation@gmail.com,
myrajanmediastation@gmail.com

वार्षिक वर्गणी व टपालासंबंधी
व्यवहारासाठी संपर्कः
०२०-३२६००९९६
९९२३३३९९३३
arthapurna.monthly@gmail.com

'अर्थपूर्ण'मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या साहित्य आणि विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

'अर्थपूर्ण'मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील मजकुराची सत्यता पडताळून आणि योग्य शहानिशा करूनच वाचकांनी जाहिरातीबाबत कोणतेही व्यवहार करावेत. जाहिरातीत केलेल्या दाव्यांबाबत 'अर्थपूर्ण' कोणत्याही प्रकारची हमी घेत नाही.

गुंतवणुकीसंबंधी सर्व लेख समज वाढवण्यासाठी प्रसिद्ध केले जातात. त्यांस गुंतवणुकीसंबंधी सल्ला मानू नये. प्रसिद्ध केलेल्या माहितीवर आधारित कोणताही व्यवहार स्वतःच्या जबाबदारीवर करावा. 'अर्थपूर्ण' व सदर लेखक त्यासंबंधीची कोणतीही जबाबदारी स्वीकारणार नाहीत.

# अनुक्रमणिका

**०४ प्रवास सुखाचा व्हावा म्हणून...**यमाजी मालकर
**०६ नियोजन : बचत आणि गुंतवणुकीचे...**वंदना धर्माधिकारी
**१० आर्थिक नियोजनाला द्या, भक्कम कृतीची जोड!...**यशराज
**१४ गुढी पाडवा, शुभकार्ये आणि उन्हाळी चटका...**विजय तरवडे
**१७ इन्ट्राडे ट्रेडिंग करताना...**गौरव मुठे
**२० फ्युचर्स : आव्हानात्मक व आकर्षक ट्रेडिंग...**संदीप साठे
**२२ पंचविशीतले नियोजन...**प्रसाद मिरासदार
**२४ कौटुंबिक गुंतवणूक : एक भांडवली गुंता...**रवींद्र तांबोळी
**२६ अर्थसंकल्प आणि आर्थिक साक्षरता...**कल्याण टांकसाळे
**२८ केंद्रीय अर्थसंकल्प : ठळक नोंदी...**रेखा धामणकर
**३० अमेरिकेत स्थलांतरितांसाठी कायद्याची चाहूल...**परिमल माया सुधाकर
**३२ 'एलबीटी'चा औरंगाबाद पॅटर्न...**दत्ता जोशी
**३६ क्लीन नोट पॉलिसी...**गिरीश धर्माधिकारी
**३८ सार्वजनिक आरोग्यासाठीचा एक 'ग्रीन' प्रयत्न...**नेहा घाटपांडे,
**४० ट्रॉफी, भूमी, कपॅसिटर आणि एक स्वप्न...**यमाजी मालकर

'अर्थपूर्ण' हे मासिक मालक, अर्थपूर्ण पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्याकरिता **मुद्रक व प्रकाशक यमाजी मालकर** यांनी विक्रम प्रिंटर्स प्रा. लि. ३१,३४ पर्वती इंडस्ट्रीयल इस्टेट, पुणे-सातारा रस्ता, पुणे ९ येथे छापून ए-७०२,साम्राज्य, शिवतीर्थनगर, पौड रस्ता, पुणे ४११०३८(सुतारदरा बसथांब्याजवळ) येथे प्रसिद्ध केले. **संपादक : यमाजी मालकर**

# प्रवास सुखाचा व्हावा म्हणून....



**यमाजी मालकर**
ymalkar@gmail.com

**गुंतवणुकीचे नियम माणसांनीच तयार केले आहेत आणि माणसांसाठीच तयार केले आहेत. मात्र आपल्याला लक्षात येईल की 'पळा पळा कोण पुढे पळे तो' या न्यायाने आणि अनेक ठिकाणी तर दुसऱ्यांच्या खिशात हात घालण्याची एक चलाखी म्हणूनही ते केले गेले आहेत. त्यामुळे त्यात ताण वाढले आहेत. नाहीतर नियोजनात ताण का वाढावेत ? हे ताण कमी व्हावेत आणि आपणास महामार्गाचे नियम समजण्यास सोपे व्हावेत, म्हणजे आपला प्रवास सुखकर व्हावा, असा प्रयत्न या वेळी 'अर्थपूर्ण'ने केला आहे.**

एक स्पष्ट केले पाहिजे की मानवी जीवनात आरोग्य, शिक्षण, कुटुंब आणि मित्रांच्या नात्यांना जेवढे महत्त्व आहे, तेवढे कशालाच नाही. आरोग्य चांगले ठेवणे आणि त्याचे संवर्धन करणे हे आपल्या मनावर आणि दिनक्रमावर अवलंबून असते, याविषयी कोणाचे दुमत नाही. मात्र वरवर सोपी वाटणारी बाब सध्याच्या आधुनिक आयुष्यात दूरदूर पळताना दिसते आहे. माणसाने दिवसातील काही विशिष्ट वेळ शरीरासाठी द्यावा, अशी रचना निसर्गानेच केली आहे. मात्र त्या वेळांत करिअरची सतत घुसखोरी सुरू आहे. त्याचा परिणाम असा झाला की आरोग्य ही एक नैसर्गिक गोष्ट न राहता ती आधुनिक काळात कृत्रिम गोष्ट होत चालली आहे. ज्या मानसिक आरोग्यावर हा सर्व डोलारा उभा आहे, त्याविषयी तर काही सर्वमान्य शब्दांपर्यंत पोहोचणे आज तरी अशक्य वाटावे, अशी परिस्थिती आहे. या परिस्थितीने एक बदल असा केला आहे, आपल्याला 'सामान्य' माणूस म्हणून चांगले जीवन जगण्याची संधी आली असताना 'असामान्य' जीवनाच्या मागे पळणाऱ्या माणसांची संख्या सतत वाढतच चालली आहे.

शिक्षण हा तर सध्याच्या जगात प्रगतीचा पासवर्ड झाला आहे. शिक्षणाने माणसाला चांगले आणि वाईट नेमके कशाला म्हणायचे हे ओळखण्यासाठीची सदसद्विवेकबुद्धी दिली पाहिजे, असे म्हटले जाते. मात्र आजच्या शिक्षणाची व्याख्या आपण सर्वच जण जाणतो. या शिक्षणात परीक्षा पास होण्याला महत्त्व असून एकूणच संधी कमी असल्याने हुशारीचा तो निकष आता आपण सर्वांनीच स्वीकारला आहे. एवढेच नव्हे तर त्या निकषावर इतरांना कमी लेखून आपणच जगण्यास कसे लायक आहोत, अशी मुजोरीही अनेकांनी आत्मसात केली आहे. शिक्षणात एक गोष्ट फार महत्त्वाची आहे, ती अशी की माणसाचे सार्वजनिक जीवन वैयक्तिक जीवनासारखेच अधिकाधिक समृद्ध होत गेले पाहिजे आणि उच्च शिक्षण घेणाऱ्यांनी त्यात पुढाकार घेतला पाहिजे. आज मात्र तसे होताना दिसत नाही. होते असे की उच्च शिक्षण याचा अर्थ अधिक कमाईचे शिक्षण याला समाजाने मान्यता देऊन टाकल्याने शिक्षणाचे मूळ उद्देश्यच मागे पडले आहेत.

कुटुंबाचे म्हणजे कौटुंबिक नात्यांचे महत्त्व मानवी आयुष्यात किती आहे, याविषयी अधिक चर्चा करण्याची खरे म्हणजे काही गरज नाही. आपल्या अस्तित्वापासून आपल्या सर्व सुखदुःखात सोबत असणारे कुटुंब सोडून कोणी माणूस सुखी झाल्याची उदाहरणे नाहीत. माणसांत म्हणजे समाजात जगतानाची ओळख तर कुटुंब मिळवून देतेच, पण तो ज्या परिसरात आणि मुशीत जगायला शिकतो, तो परिसर आणि मुशीही कुटुंबच घडवत असते. ज्यांना या मर्यादा वाटतात, ते त्या ओलांडून पुढे जातात, पण अशी माणसे बोटावर मोजण्याइतकीच असतात. त्यातही त्यांच्या आयुष्याच्या अखेरच्या टप्प्याकडे पाहिले तर ती कुटुंबाच्या कुशीत विसावताना दिसतात.

बहुतांश माणसांचे आयुष्य आपल्या कुटुंबाभोवती फिरत असते, हेच खरे.

जेवढे कुटुंब महत्त्वाचे आहे, तेवढेच मित्रांचे नाते महत्त्वाचे आहे. कारण माणूस हा सामाजिक प्राणी आहे, हे जे माणसाचे अपरिहार्य सामाजिकीकरण आहे त्यात मित्र हा त्याचे बोट धरणारा आणि त्याचे समाधान करणारा पहिला घटक आहे. माणूस कामाच्या ठिकाणीही रमतो, मात्र त्याला सतत आस असते ती आपले भूत, वर्तमान आणि भविष्य मित्रांकडे व्यक्त करण्याची. ती आजही काही तहानभुकेसारखी गरज मानली जात नसली तरी ते मित्रांशी व्यक्त होणे थांबले तर अन्न गोड लागत नाही, याचा अनुभव कधी ना कधी येतोच.

आरोग्य, शिक्षण, कुटुंब आणि मित्रांच्या या नात्यांमध्ये पैशाचा संबंध कोठे आला, असा प्रश्न आपल्या मनात आलाच असणार. आणि आलाच पाहिजे. कारण आपले जे एक सुंदर जैविक जगणे आहे, त्याला पैसा नावाच्या कृत्रिम साधनाने असे घट्ट बांधले आहे की जैविक जगण्यासाठी त्याचा विचार अपरिहार्य झाला आहे. ही अपरिहार्यता इतक्या टोकाला गेली आहे की जणू माणसाच्या नैसर्गिक जगण्यापेक्षा ते अधिक महत्त्वाचे ठरते आहे. त्यामुळेच मग ते कमावणे आले, त्याची हेतूपूर्वक देवाणघेवाण आली. त्याचा साठा आला. त्याच्याशी जोडलेली प्रतिष्ठा आणि सुखदुःखे आली. माणसाच्या आयुष्यात त्याच्या नियोजनाला आजच महत्त्व आले आहे, असे नाही, मात्र आज त्याच्याशिवाय




जगणे अवघड झाले, हे अमान्य करता येणार नाही. वेळच्या वेळी गुंतवणूक करणे, तिचे नियोजन करणे आणि त्यावर आपले आयुष्य उभे करणे... हाच जणू जगण्याचा महामार्ग होऊ घातला आहे. आणि महामार्गावर तुम्ही गेलात की तुम्हालाही महामार्गाचे नियम लागू होतात, तसे आज आपण जागतिकीकरणाच्या महामार्गावरील नियमांनी जगत आहोत. मी माझा वेग कमी करीन, मी माझा वेग वाढवीन, असे आपण म्हणू शकतो, मात्र तसे आपण करू शकत नाही, याची आपल्याला जाण आहे.

गुंतवणुकीचे नियम माणसांनीच तयार केले आहेत आणि माणसांसाठीच तयार केले आहेत. मात्र आपल्याला लक्षात येईल की 'पळा पळा कोण पुढे पळे तो' या न्यायाने आणि अनेक ठिकाणी तर दुसऱ्यांच्या खिशात हात घालण्याची एक चलाखी म्हणूनही ते केले गेले आहेत. त्यामुळे त्यात ताण वाढले आहेत. नाहीतर नियोजनात ताण का वाढावेत ? हे ताण कमी व्हावेत आणि आपणास महामार्गाचे नियम समजण्यास सोपे व्हावेत, म्हणजे आपला प्रवास सुखकर व्हावा, असा प्रयत्न या वेळी 'अर्थपूर्ण'ने केला आहे. आपल्याला तो आवडेल, अशी खात्री आहे.